एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील मुलांसाठी बौध्दीक खेळणी "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" पुरविणेबावत.

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.६०/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

<u>वाचा</u> :- १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र. एबाविसेयो/का-६/२५४/२०१५, दिनांक ०४.०२.२०१५
२) महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे परिपत्रक क्र.भांखस/हातकागद/दर निश्चिती (४०)/२०१२-२०१३/बी-१४१५४,दि.२७.९.२०१२
३)महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे परिपत्रक क्र.भांखसं/हातकागद/दर निश्चिती/(१३)/२०१३-१४/सी-२९५२, दि.०४.०३.२०१४
४)महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे परिपत्रक क्र.भांखसं/हातकागद/दर निश्चिती/(१६)/२०१४-१५/अे-१०१७, दि.१२.०८.२०१४

<u>प्रस्तावना</u> :- सन २०१४-१५ या चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने मंजूर केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना ही नवीन योजना २० जिल्हयांसाठी लागू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत प्रति अंगणवाडी केंद्र प्रत्येक वर्षी रु.२,०००/- व प्रति मिनी अंगणवाडी केंद्र प्रत्येक वर्षी रु.१,०००/- इतका निधी पूर्व प्राथमिक शिक्षण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिला आहे. या निधीतून ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी केंद्रांना "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण प्रकल्पातील [४४६०० अंगणवाडी केंद्र व ४९५१ मिनी अंगणवाडी केंद्रांना "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" प्रति केंद्र ३ संच व नागरी प्रकल्पातील ९९७६ अंगणवाडी केंद्रांना "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" प्रति केंद्र ५ संच] (प्रति "कल्पक रचना संच" रु.११९/- व "चित्रकोडी संच" रु.१२७.५० दराप्रमाणे) महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांचे परिपत्रक क्र.भांखसं/ हातकागद/दरनिश्चिती/(४०)/२०१२-२०१३/बी-१४१५४, दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ च्या परिपत्रकातील परिशिष्ट अ मधील (अ. क्र. ४३ "कल्पक रचना संच" रु.११९/- व अ. क्र. ४४ "चित्रकोडी संच" रु.१२७.५०) दरनिश्चितीनुसार व त्यातील विनिर्देशानुसार (Specification नुसार) मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई यांनी मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई / हातकागद संस्था, पुणे यांच्याशी करण्यात आलेल्या दरनिश्चितीनुसार व सदर दरनिश्चितीस मुदतवाढ दिलेल्या परिपत्रक क्र.भांखसं/ हातकागद/दर निश्चिती/(१३)/२०१३-१४/सी-२९५२, दिनांक ०४.०३.२०१४ व परिपत्रक क्र.भांखसं/हातकागद/दर निश्चिती/(१६)/२०१४-१५/अे-१०१७, दिनांक १२.०८.२०१४ नुसार खरेदी करण्यासाठी लागणारा रु.४,८९,३८,३८५/- (रुपये चार कोटी एकोणनव्वद लाख अडोतीस हजार

तीनशे पंच्याऐंशी फक्त) एवढा निधी सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना दरकरारातील दर व विनिर्देश (Specification) च्या अधिन राहून खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यास शासन मंजूरी देत आहे.

| अ क्र | साहित्याचे नांव | वस्तुचे विनिर्देश | पुरवठा करावयाची अंगणवाडी / मिनी अंगणवाडी केंद्र संख्या | पुरवठा करावयाचे एकूण संच | दर (प्रतिसंच) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कल्पक रचना संच : विविध आकारापासून चित्रे निरनिराळया रचना करण्यासाठी, कल्पकता, निरीक्षण, तर्क विकासास उपयुक्त | तपशिल : २५० ते ३०० जी.एस.एम. व्हाईट बोर्ड, लॅमिनेशसह ४ रंगाचे ६ ते ८ आकाराचे नग प्लॅस्टिक बॅगमध्ये पॅकिंग व संचाच्या माहितीपत्रकासह | (अ) ग्रामीण प्रकल्प अंगणवाडी केंद्र ४४६०० (प्रति केंद्र ३ संच) | १३३८०० | ११९.०० | १,५९,२२,२००/- |
| | | | मिनी अंगणवाडी केंद्र ४९५१ (प्रति केंद्र ३ संच) | १४८५३ | ११९.०० | १७,६७, ५०७/- |
| २ | चित्रकोडी संच : कल्पकता, निरीक्षण, तर्क विकासास उपयुक्त | तपशिल : २५० ते ३०० जी.एस.एम. व्हाईट बोर्ड, चाररंगी छपाई, लॅमिनेशसह वयोगटाप्रमाणे १२ ते १६ चित्रांचा समावेश असलेला संच प्लॅस्टिक बॅगमध्ये पॅकिंग व संचाच्या माहितीपत्रकासह | (अ) ग्रामीण प्रकल्प अंगणवाडी केंद्र ४४६०० (प्रति केंद्र ३ संच) | १३३८०० | १२७.५० | १,७०,५९ ,५००/- |
| | | | मिनी अंगणवाडी केंद्र ४९५१ (प्रति केंद्र ३ संच) | १४८५३ | १२७.५० | १८,९३,७५८/- |
| | | एकूण (अ) | ४९५५१ | ----- | ----- | ३,६६,४२, ९६५/- |
| १ | कल्पक रचना संच : विविध आकारापासून चित्रे निरनिराळया रचना करण्यासाठी, कल्पकता, निरीक्षण, तर्क विकासास उपयुक्त | तपशिल : २५० ते ३०० जी.एस.एम. व्हाईट बोर्ड, लॅमिनेशसह ४ रंगाचे ६ ते ८ आकाराचे नग प्लॅस्टिक बॅगमध्ये पॅकिंग व संचाच्या माहितीपत्रकासह | (ब) नागरी प्रकल्प अंगणवाडी केंद्र ९९७६ (प्रति केंद्र ५ संच) | ४९८८० | ११९.०० | ५९,३५,७२०/- |
| २ | चित्रकोडी संच : कल्पकता, निरीक्षण, तर्क विकासास उपयुक्त | तपशिल : २५० ते ३०० जी.एस.एम. व्हाईट बोर्ड, चाररंगी छपाई, लॅमिनेशसह वयोगटाप्रमाणे १२ ते १६ चित्रांचा समावेश असलेला संच प्लॅस्टिक बॅगमध्ये पॅकिंग व संचाच्या माहितीपत्रकासह | नागरी प्रकल्प अंगणवाडी केंद्र ९९७६ (प्रति केंद्र ५ संच) | ४९८८० | १२७.५० | ६३,५९,७००/- |
| | | एकूण (ब) | ९९७६ | ----- | ----- | १,२२,९५,४२०/- |
| | | एकूण (अ + ब) | ५९५२७ | ----- | ----- | ४,८९,३८,३८५/- |

२. "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" खरेदी करतांना खालील अटी विचारात घेण्यात याव्यात :-

i) "कल्पक रचना संच" हे [तपशिल : २५० ते ३०० जी.एस.एम. व्हाईट बोर्ड, लॅमिनेशनसह ४ रंगाचे ६ ते ८ आकाराचे नग प्लॅस्टिक बॅगमध्ये पॅकिंग व संचाच्या माहितीपत्रकासह] व "चित्रकोडी संच" हे [तपशिल : २५० ते ३०० जी.एस.एम. व्हाईट बोर्ड, चाररंगी छपाई, लॅमिनेशसह वयोगटाप्रमाणे १२ ते १६ चित्रांचा समावेश असलेला संच प्लॅस्टिक बॅगमध्ये पॅकिंग व संचाच्या माहितीपत्रकासह] या स्वरुपात राहील.

ii) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी वरील "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" हे पुरवठा विहीत नमुन्याप्रमाणे (Sample, specification) असल्याची खात्री करुन त्याबाबतचा अहवाल आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना सादर करावा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी एकत्रित अहवाल महिला व बाल विकास विभागास सादर करावा.

iii) "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" ची मागणी व पुरवठा CSPO ने दरनिश्चितीच्या परिपत्रकात/ दरकरार पत्रकात केल्याप्रमाणे केला जाईल व त्यातील तसेच दरनिश्चितीच्या परिपत्रकात/ दरकरारपत्रकात मुदतवाढ देण्याबाबतच्या दिनांक ०४.०३.२०१४ रोजीच्या पत्रातील कागदाचा प्रकार व विनिर्देश व अटींची पुर्तता काटेकोरपणे केली जाईल याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी घ्यावी.

iv) सदर वस्तूंचा पुरवठा पुरवठाधारकामार्फत प्रकल्पस्तरावर करण्यात यावा. सदर पुरवठा प्रकल्प स्तरापर्यंत वेळेवर होईल याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी योग्य ती दक्षता घ्यावी. सदर वस्तूंचा पुरवठा प्रकल्पस्तरापर्यंत झाल्याची पोच मिळाल्यानंतरच देयके अदा करण्यात यावीत.

v) सदर वस्तूंचे खरेदी, वाटप, पुरवठा व विनियोगामध्ये काही अनियमितता झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

vi) वरीलप्रमाणे "कल्पक रचना संच" व "चित्रकोडी संच" हे पुरवठा झाल्यानंतर त्याचा वापर अंगणवाडी केंद्रातील लाभार्थी नियमीतपणे करतील याची योग्य ती काळजी घेण्यात यावी.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत पूर्व शालेय शिक्षण या बाबी अंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**अ) ग्रामीण क्षेत्र :-**

**१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - रु.३,२९,७८,६६८/-**

लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (११) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १५९८) ३१ सहाय्यक अनुदान

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - रु.३६,६४,२९७/- लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्क.त योजना, (०४) (१२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६०४) ३१ सहाय्यक अनुदान

ब) नागरी क्षेत्र :-

१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - रु.१,१०,६५,८७८/- लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (नागरी) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १६१३) ३१ सहाय्यक अनुदान

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - रु.१२,२९,५४२/- लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्क.त योजना, (०४) (१४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (नागरी) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६२२) ३१ सहाय्यक अनुदान. या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ १११/व्यय-६, दिनांक ३०.०१.२०१५ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४३६/का.६, दिनांक ११.०२.२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजन, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहायक संचालक (वित्त व लेखा), एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई / हातकागद संस्था, पुणे
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४ (अर्थसंकल्प)
निवड नस्ती (कार्या.६)